# मध उत्पादकांना येणार 'सोनेरी' दिवस

## प्रतिकिलोचा दर ३५० रुपये : पश्चिम घाटात सर्वेक्षण

- सेंद्रीय मध गोळा करण्यास मध संचालनालयाचे कर्मचारी जाणार
- मधाची शुध्दता व गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार
- प्रयोगशाळातील सर्व कसोट्यावर उतरणारा मध खरेदी केला जाणार

महाबळेश्वर : प्रतिनिधी

महाबळेश्वर व पश्चिम घाटातील समृद्ध वनातून निघणारा मध आता सेंद्रीय मध म्हणून लोकांना मिळणार आहे. खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मध संचालनालयास नुकतेच सेंद्रीय मध प्रमाणपत्र मिळाले असून सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मधाचा दर आता ३५०रुपये प्रती किलो मिळणार असून संचालनालयास मिळणाऱ्या नफ्यातूनही १५ टक्के नफा मध उत्पादकांना देण्यात येणार असल्याची माहिती राज्याच्या खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश देवकर यांनी दिली. त्यामुळे पश्चिम घाटातील मधास आता 'सोनेरी' दिवस येणार आहेत.

पश्चिम घाट परिसरात विशेषतः सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील डोंगरी भागात मोठ्या प्रमाणात कार्यरत असलेल्या मध उद्योगास खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत चालना देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेळीपालन, कुक्कुटपालन यासारख्या उपजिविकेचे दुय्यम साधन असणाऱ्या व्यवसायाच्या तुलनेत मधमाशा पालन व्यवसायाची चांगली परिस्थिती निर्माण होणे आवश्यक आहे. मध विक्रीतून चांगला पैसा मधपाळ शेतकऱ्यांना मिळणे अभिप्रेत आहे. शिवाय या भागात निसर्गसंपत्ती समृद्ध असल्याने या वनस्पतींपासून निर्माण होणारा मध निश्चितच चांगल्या प्रतीचा असल्याने अशा मधाला चांगली बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. तरच मधपाळ शेतकऱ्यांना चांगला दर देता येईल.

स्थानिक परिस्थितीचा विचार केला तर पश्चिम घाट भागात सेंद्रीय मध गोळा करण्यास मोठा वाव असल्याचे दिसून आले. त्यासंदर्भात केंद्रशासनाची मान्यता असलेल्या नॅचरल ऑर्गेनिक सर्टिफिकेशन ॲग्रो या संस्थेशी संपर्क साधून त्यांचे सर्कल सातारा(१२गावे), सांगली (६गावे), कोल्हापूर (२२ गावे) व सिंधुदुर्ग (६ गावे) अशी ४६ गावे सेंद्रीय मधगोळा करण्यासाठी समाविष्ट करण्यात आली आहेत. अर्थातच हे पहिल्या फेरीतील सर्वेक्षण असून उर्वरित चारही जिल्ह्यातील गावे सेंद्रीय मध श्रेणीत अंतर्भूत करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत, अशी माहिती मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश देवकर यांनी दिली.

पश्चिम घाटातील रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नगर, नाशिक, नंदुरबार, धुळे व पुणे या सर्व जिल्ह्यातील सेंद्रीय मध निर्मितीसाठी अनुकूल असलेल्या भागाचे सर्वेक्षण करून ही सर्व गावे सेंद्रीय मध या योजनेंत अंतर्भूत करण्यात येत आहेत.

सेंद्रीय मध विक्रीतून मध संचालनालयाला मिळणाऱ्या नफ्यातून मधपाळांना १५ टक्के प्रतिकिलो वाटा देण्यात येणार आहे. तो वाटा वर्षाच्या शेवटी साहित्य स्वरूपात देण्यात येणार आहे, अशी माहिती मध संचालनालयाचे संचालक बी. बी. जगताप यांनी दिली. सेंद्रीय मधाची विक्री वाढविण्यासाठी आकर्षक काचेच्या बाटल्या तसेच लेबल व ब्रँड डिझाईन तयार करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.